# वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड

## मराठी विभाग

2023-24

## यशवंतराव चव्हाण विशेषांक प्रकाशन

प्रमुख पाहुणे : मा. प्रा. डॉ. शिवाजी हुस
(संपादक, तिफण त्रैमासिक)

अध्यक्ष : मा. डॉ. एस. आर. सरोदे
प्रभारी प्राचार्य, वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड

Scanned with OKEN Scanner




Scanned with OKEN Scanner

दैनिक
# दखनी स्वराज्य
सामान्यांच्या न्यायहक्कासाठी

मंगळवार दि.२७ फेब्रुवारी २०२४ | संपादक : संतोष श्रीमंतराव तांबे | 9850017175

छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड येथे तालुका प्रतिनीधी नेमणे आहे. मो. ९८५००१७१७५

# कराड येथील वेणूताई चव्हाण महाविद्यालयात तिफणच्या यशवंतराव चव्हाण विशेषांकाचे प्रकाशन




कन्नड :साहित्य कला, आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक तिफण हे गेली पंधरा वर्ष सातत्याने प्रकाशित होत असून या त्रैमासिकाच्या वतीने विविध विषयांवर विशेषांक प्रसिद्ध करण्यात आले आहे. यशवंतराव चव्हाण यांच्या जीवन, कार्य, साहित्य यावर प्रकाश टाकणारा महत्वाचा संदर्भ मूल्य लाभलेला विशेषांक प्रसिद्ध करण्यात आला आहे. या विशेषांकाचे चार भाग असून महाराष्ट्रातील विविध भागातील नामवंत अभ्यासकांचे लेख आहेत. या विशेषांकाचे प्रकाशन कराड येथील वेणूताई चव्हाण महाविद्यालयात मराठी विभागातर्फे नुकतेच करण्यात आले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. एस. आर.सरोदे मॅडम होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख डॉ. संतोष बोंगाळे यांनी केले. यावेळी तिफणचे संपादक डॉ. शिवाजी हुसे यांनी तिफणच्या वाटचालीचे व वाङ्मयीन क्षेत्रातील योगदानाची माहिती देवून विशेषांकाचे स्वरूप विशद केले. ते म्हणाले की, यशवंतराव चव्हाण हे आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार असून त्यांनी राजकीय क्षेत्राबरोबरच साहित्य क्षेत्रात महत्वपूर्ण योगदान दिले आहे. यशवंतराव चव्हाण यांचे कृष्णाकाठ वाचून मी प्रभावित झालो. त्यानंतर त्यांचे अन्य लेखन वाचले. हा ठेवा नव्या पिढी पर्यंत जावा या भूमिकेतून या विशेषांकाचे प्रकाशन केले आहे. कराडच्या पावन भूमित या अंकाचे प्रकाशन व्हावे ही माझी ईच्छा होती. प्राचार्या डॉ. एस.आरसरोदे अध्यक्षीय समारोप करतांना म्हणाल्या की, तिफण हे दखलपात्र त्रैमासिक असून तिफण ने अनेक महत्वाचे विशेषांक प्रसिद्ध करून ऐतिहासिक कार्य केले आहे. या अंकाचे प्रकाशन आमच्या महाविद्यालयात होणे ही आनंदाची बाब आहे. असे मत व्यक्त केले. कार्यक्रमास विद्यार्थी व प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner

समय ॲडस् & पब्लिकेशन
❖प्रेस कॉन्फरन्स, ❖प्रेस रिलीज,
❖ॲडव्हर्टायझिंग, ❖प्रकाशने, ❖जॉबवर्क,
❖मार्केटींग,
हरिहरानंद कॉम्प्लेक्स,रामनगर, सिडको,एन-२,,
छत्रपती संभाजीनगर . संपर्क - मो.,९४२२२४३२४६

# प्रसार

मराठवाड्यातील जनतेचं हक्काचं दैनिक

आयुष आयुर्वेदिक पंचकर्म व होमिओपॅथिक हॉस्पिटल
डॉ. ऋषिकेश मदनुरकर
बी.ए.एम.एस.
आयुर्वेदिक पंचकर्म तज्ञ
डॉ. रेणुका मदनुरकर (काळे)
बी.एच.एम.एस
होमिओपॅथिक तज्ञ

छत्रपती संभाजीनगर ❖ वर्ष १७ वे ❖ अंक १७९ वा संपादक - कानीप अन्नपूर्णे बुधवार, दि.२८ फेब्रुवारी २०२४ ❖ कि. २ रुपये ❖ पाने ४

# तिफणने वाजवला पश्चिम महाराष्ट्रात डंका

## वेणूताई चव्हाण महाविद्यालयात झाले यशवंतराव चव्हाण विशेषांकाचे प्रकाशन

## तिफणकार डॉ. शिवाजी हुसे यांच्या मेहनत व सचोटीला सलाम

कन्नड/प्रतिनिधी - साहित्य कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक 'तिफण 'गेल्या १५ वर्षांपासून सातत्याने प्रकाशित होत असून, या त्रैमासिकाने आतापर्यंत विविध क्षेत्रातील वेगवेगळ्या विषयांवर अनेक विशेषांक प्रकाशित केले आहे.यशवंतराव चव्हाण यांच्या जीवन, कार्य आणि साहित्यावर प्रकाश टाकणारा, महत्वपूर्ण संदर्भमूल्य लाभलेला विशेषांक कराड येथील वेणूताई चव्हाण महाविद्यालयात प्रसिद्ध करण्यात आला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.एस.आर. सरोदे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख डॉ. संतोष बोंगाळे यांनी केले. यावेळी तिफणचे संपादक डॉ. शिवाजी हूसे यांनी तिफणच्या वाटचालीची व वाङमयीन क्षेत्रातील योगदानाची माहिती देताना या विशेषांकाचे स्वरुप विशद केले. ते म्हणाले की, यशवंतराव चव्हाण हे आधुनिक भारताचे शिल्पकार असून, त्यांनी राजकीय क्षेत्राबरोबरच साहित्य क्षेत्रात भरीव योगदान दिले आहे. त्यांचे ' कृष्णाकाठ' वाचून मी प्रभावित झालो, त्यानंतर त्यांचे अन्य साहित्य वाचले. हा ठेवा नव्या पिढीपर्यंत जावा, कराडच्या पावन भूमीत या अंकाचे प्रकाशन व्हावे अशी इच्छा होती.या भूमिकेतून या विशेषांकाचे प्रकाशन केले. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ.एस.आर. सरोदे म्हणाल्या की, तिफण हे दखलपात्र त्रैमासिक असुन त्यांनी आतापर्यंत अनेक महत्वाचे विशेषांक प्रकाशित केले आहे.या अंकाचे प्रकाशन आपल्या महाविद्यालयात झाले, हे आपले भाग्य असून ही आपल्यासाठी आनंदाची बाब आहे असे प्रतिपादन त्यांनी केले.



पत्रकार,विठ्ठल शिरसे कन्नड.

Scanned with OKEN Scanner

# कराड येथे तिफणच्या यशवंतराव चव्हाण विशेषांकाचे प्रकाशन

दैनिक देशोन्नती कन्नड



**कन्नड :** साहित्य कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक तिफण हे गेली पंधरा वर्ष सातत्याने प्रकाशित होत असून या त्रैमासिकाच्या वतीने विविध विषयांवर विशेषांक प्रसिद्ध करण्यात आले आहे. यशवंतराव चव्हाण यांच्या जीवन, कार्य, साहित्य यावर प्रकाश टाकणारा महत्वाचा संदर्भ मूल्य लाभलेला विशेषांक प्रसिद्ध करण्यात आला आहे. या विशेषांकाचे चार भाग असून महाराष्ट्रातील विविध भागातील नामवंत अभ्यासकांचे लेख आहेत. या विशेषांकाचे प्रकाशन कराड येथील वेणूताई चव्हाण महाविद्यालयात मराठी विभागातर्फे नुकतेच करण्यात आले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. एस. आर. सरोदे होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख डॉ. संतोष बोंगाळे यांनी केले. यावेळी तिफणचे संपादक डॉ. शिवाजी हुसे यांनी तिफणच्या वाटचालीचे व वाङ्मयीन क्षेत्रातील योगदानाची माहिती देवून विशेषांकाचे स्वरूप विशद केले.

ते म्हणाले की, यशवंतराव चव्हाण हे आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार असून त्यांनी राजकीय क्षेत्राबरोबरच साहित्य क्षेत्रात महत्वपूर्ण योगदान दिले आहे. यशवंतराव चव्हाण यांचे कृष्णाकाठ वाचून मी प्रभावित झालो. त्यानंतर त्यांचे अन्य लेखन वाचले. हा ठेवा नव्या पिढी पर्यंत जावा या भूमिकेतून या विशेषांकाचे प्रकाशन केले आहे. कराडच्या पावन भूमित या अंकाचे प्रकाशन व्हावे ही माझी ईच्छा होती.

प्राचार्या डॉ. एस. आर. सरोदे अध्यक्षीय समारोप करतांना म्हणाल्या की, तिफण हे दखलपात्र त्रैमासिक असून तिफण ने अनेक महत्वाचे विशेषांक प्रसिद्ध करून ऐतिहासिक कार्य केले आहे. या अंकाचे प्रकाशन आमच्या महाविद्यालयात होणे ही आनंदाची बाब आहे, असे मत व्यक्त केले.

RSP

Scanned with OKEN Scanner